# परिशिष्ट क्रमांक ५

## 'दलाला'ची अनुज्ञप्ति मिळणेकरिता अर्ज केलेल्या इसमाने करुन देण्याचा करारनाम्याचा नमुना

## (उपविधी ५(२) पहा)

**मा. सभापती,**

**मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई यांसी,**

करारनामा करुन देणार मी – आम्ही

नाव ______________________________ वय __________

व्यवसायाचा पत्ता ______________________________

राहणार ______________________________

**आपल्याशी आज रोजी करारनामा करून देतो की,**

१) महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी–विक्री (नियम) अधिनियम, १९६३, त्याखालील नियम, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबईचे उपविधी व त्याखालील उपनियम मी – आम्ही संपूर्णपणे वाचले असून ते मला – आम्हास पूर्णपणे समजले आहेत व त्याप्रमाणे व त्यात पुढे वेळोवेळी होणा–या तसेच बाजार समितीचे झालेले व पुढे होणारे ठराव, हुकुम याप्रमाणे मी – आम्ही वागण्याचे कबूल करतो.

२) वरील अधिनियम, नियम, उपविधी व त्याखालील उपनियम तसेच बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशी सर्व प्रपत्रे, नोंदवह्या मी आम्ही आवश्यक ती माहिती अद्यावत लिहून ठेवीन – ठेवू. तसेच बाजार समितीस हवी असलेली माहिती वेळोवेळी फर्माविण्यात येईल. अशा नमुन्यात पुरवीन – पुरवू व ही कागदपत्रे योग्य ते अधिकार दिलेल्या अधिका–यास तपासणीसाठी उपलब्ध करुन देईन – देऊ व तपासणी कामी मदत करीन – करु.

३) मी – आम्ही व माझे आमचे वतीने अन्य व इसमांनी केलेल्या सर्व कृत्याबद्दल संपूर्णपणे जबाबदार राहीन – राहू.

४) बाजार समिती देणे असलेल्या फी व अन्य रकमा देण्यात चुकवाचुकव करणा–यांशी तसेच अनधिकृत इसमांशी मी – आम्ही कोणत्याही प्रकारचे व्यवहार करणार नाही. व अशा इसमांविरुद्ध कायदेशीर उपाययोजना करण्यास बाजार समितीस सहकार्य करीन – करु.

५) बाजार समितीशी मी – आम्ही नेहमी सहकार्याचे धोरण ठेवीन – ठेवू. बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशा रितीने आमचे कामकाज करीन – करु. बाजारातील कोणत्याही कामकाजात अडथळा येईल अगर चालू कामकाज बंद पडेल असे वर्तन करणार नाही. तसेच मी – आम्ही व्यवसाय करीत असलेल्या बाजाराची प्रतिष्ठा व लौकिक अधिकाधिक वाढेल अशा पद्धतीने मी – आम्ही कामकाज करीन – करु.

आमचे समक्ष सही केली –

सही

(१) सही ______________________________

नाव ______________________________

पत्ता ______________________________

दिनांक

(२) सही ______________________________

नाव ______________________________

पत्ता ______________________________